# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८(१) अन्वये आदेश

४१६१ जा.क्र.ना.बॅका/कमकोबँक/कलम .८८/आदेश/सन-२०१६
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,नाशिक यांचे कार्यालय
सहकार संकुल सारडा सर्कल, नॅशनल ऊर्दु हायस्कुलजवळ
नाशिक. दिनांक :- 15/०६/२०१६

**वाचले** :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८(१)

२) मे. साबद्रा अॅड साबद्रा चाटर्ड अकौंटन्ट यांनी या कार्यालयास सादर केलेला २००८-२००९ या कालावधीचा लेखापरिक्षण अहवाल

३) म. सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट राज्य,पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. ना.बँका/डी-४/कळवणबँक/लेप वि अह/०९ दिनांक ११-०८-२००९ चे पत्रासोब प्राप्त झालेला मे. साबद्रा अॅड साबद्रा चाटर्ड अकौंटन्ट यांनी सादर केलेला विशेष अहवाल.

४) या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.प्रशासन/ना.बॅका/कमकोबँक/कलम .८८/आदेश/सन-२०१०, दिनांक ८/२/२०१०.

५) श्री.पी.जी.देवरे,प्राधिकृत चौकशी अधिकारी, दि.कळवण मर्चंट को.ऑप.बँक लि. कळवण जि.नाशिक तथा सहाय्यक निबधंक,सहकारी संस्था (आउयो) कळवण जि.नाशिक यांचा दिनांक ८/४/२०११ रोजी सादर केलेला चौकशी अहवाल.

६) मा.विभागीय सहनिबधंक,सहकारी संस्था,नाशिक विभाग,नाशिक,यांचे कार्यालयाकडील अपील नं.अे-७६/२०१४, दिनांक १ डिसेंबर २०१४.

ज्याअर्थी, दि.कळवण मर्चंट को.ऑप.बँक लि. कळवण जि.नाशिक ही, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ (यापुढे अधिनियम व नियम असे संबोधीण्यात येईल) मधील तरतुदीनुसार नोंदविण्यात आलेली सहकारी बँक आहे.

ज्याअर्थी, वर नमुद केलेल्या बँकेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधील तरतुदी आणि बँकेचे मंजुर उपविधीमधील तरतुदीनुसार करणे बँकेवर बंधनकारक आहे.

ज्याअर्थी, कळवण मर्चंट को.ऑप. बँक लि. कळवण या बँकेने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकिय सुचनांचे ऊल्लंघन करुन संचालक व त्यांचे नातेवाईकांना कर्ज मंजुर केले आहे तसेच कर्जाचे नुतनीकरण केले असल्याने रिझर्व्ह बँकेने रक्कम रुपये १ लाख दंड केलेला आहे. सदर दंड हा संचालक मंडळाने केलेल्या चुकीच्या कर्जवाटपामुळे करण्यात आलेला असल्याने सदर दंडाची रक्कम जबाबदार संचालक मंडळ सदस्यांकडुन व्याजासह वसुल करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, बॅकेने गुंतवणुक केलेल्या राखीव निधीतुन व इमारत निधीतुन रक्कम काढतांना त्याबाबतचा ठराव नियमित विषयात करणे आवश्यक आहे मात्र तसे न करता सदर ठराव आयत्या वेळच्या विषयात करण्यात आलेला आहे तसेच रिझर्व्ह फंडाची रक्कम काढतांना त्यास निबंधकाची मंजुरी घेणे आवश्यक असतांना तशी मंजुरी न घेताच परस्पर व्यवहार करुन निबंधकांच्या अधिकारांचा गैरवापर केलेला आहे. तसेच अधिनियम व नियमातील तरतुदींचे उल्लंघन



Scanned by CamScanner

केलेले आहे बँकेस झालेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करणे बँकेच्या आर्थिक हिताचे दृष्टीने आवश्यक झाले आहे.

ज्याअर्थी बँकेने केलेल्या कर्जवाटपामध्ये गंभीर त्रुटी आढळुन आलेल्या आहेत. तसेच बॅकेने वाटप केलेले असुरक्षित कर्ज थकबाकी झाल्याने तसेच थकीत कर्जाची खाती बंद करतांना नियमबाहय सुट दिलेली आहे. त्यामुळे बॅकेचे आर्थिक नुकसान झालेले असुन सदर नुकसानीची भरपाई जबाबदार संचालकांकडुन वसुल करणे आवश्यक आहे. बॅकेने सन २००६ मध्ये झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना भेटवस्तु देण्यांचा ठराव केला होता. मात्र त्यासाठी या कार्यालयाची रु. १२.५० लाख मंजुरी असतांना प्रत्यक्षात रु. १५.९५ लाख इतका खर्च केलेला आहे. जास्त केलेल्या खर्चाची परवानगी घेतलेली नाही. सदर नुकसानीची भरपाई जबाबदार संचालकांकडुन वसुल करणे आवश्यक आहे.

मा.विभागीय सहनिबधंक,सहकारी संस्था,नाशिक विभाग,नाशिक यांचेकडील दिनांक १/१२/२०१४ रोजीच्या आदेशान्वये दि कळवण मर्चंन्ट को-ऑप बँक लि.कळवण ता.कळवण जि.नाशिक या बँकेच्या यापुर्वी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये श्री.पी.जी.देवरे,प्राधिकृत चौकशी अधिकारी तथा सहाय्यक निबधंक,सहकारी संस्था (आउयो) कळवण जि.नाशिक यांनी दिनांक ८/४/२०११ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालाविरुध्द २९ सभासदांनी दाखल केलेल्या अपील अर्जात दिलेल्या निर्णयानुसार सदरील बँकेची फेरचौकशी करणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

त्यानुसार बॅकेच्या व्यवस्थापनात ज्या पदाधिकारी, संचालक, अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग आहे, जे पदाधिकारी, संचालक, अधिकारी व कर्मचारी दोषी आहेत व ज्या पदाधिकारी, संचालक, अधिकारी व कर्मचारी यांनी बँकेच्या निधीचा दुरुपयोग अधिकाराने अथवा अनाधिकाराने केला आहे अशा व्यक्तींविरुध्द दोषारोप निश्चित करुन त्यांना नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्या दोषांसंबंधी म्हणणे मांडण्याची संधी देऊन संबंधीतांकडुन गैरव्यवहारातील रक्कम व्याजासह वसुलीचे आदेश निर्गमित करणे आवश्यक झालेले आहे म्हणुन चौकशी अहवालात नमुद खालील केलेल्या व्यवहारांबाबत प्राथमिक चौकशी करुन संबंधीतांवर दोषारोप ठेवुन जबाबदारी निश्चित करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, माझी खात्री झालेली आहे की, उक्त नमुद लेखापरिक्षण अहवालातील मुद्यांबाबत बॅकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची व्याप्ती निश्चीत करुन त्याबाबतच्या रक्कमांची जबाबदारी संबंधितांवर निश्चीत करणे तसेच नुकसानीचे व्यक्तीवार प्रमाण व जबाबदारी निश्चीत करणे क्रमप्राप्त आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

Scanned by CamScanner

## :: आ दे श ::

मी, निलकंठ करे, जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,नाशिक, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये दि कळवण मर्चंन्ट को-ऑप बँक लि.कळवण ता कळवण जि. नाशिक ह्या बँकेच्या लेखापरिक्षण अहवाल व विशेष अहवालातील गंभीर मुद्दे तसेच सोबत जोडलेल्या **परिशिष्ट " अ "** मधील मुद्यांवर कलम ८८(१) नुसार चौकशी करण्यासाठी श्री. एस० एस० गिते, प्राधि यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी प्रस्तुतच्या आदेशात नमुद केलेल्या व्यवहारांमध्ये बँकेस झालेल्या नुकसानीचे व त्यांना मंजुर करण्यात आलेल्या चौकशी फी चे संबंधीत व्यक्तीवार प्रमाण निश्चित करुन तसेच जबाबदारी निश्चित करुन या बाबतचे आदेश, या आदेशाचे तारखेपासुन सहा महिन्याचे कालावधीत पारीत करावेत. प्राधिकृत अधिकारी यांना या कामकाजाबाबतच्या मानधनाचा आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यांत येईल.

सदरचा आदेश आज दिनांक रोजी माझे सहीशिक्क्यानिशी दिला असे.

DIST. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था
नाशिक

(निलकंठ करे)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था,नाशिक

क.लि. व.लि. का.अ. स.नि.

प्रतः-

१) चेअरमन /मुख्य कार्यकारी अधिकारी, दि. कळवण मर्चंन्ट को-ऑप.बँक लि. कळवण ता.कळवण

२/- त्यांना कळविण्यात येते की, चौकशीकामी आवश्यक ती सर्व कागदपत्रे चौकशी अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावीत.

२) श्री. एस.एस. गिते, प्राधि देवळा

२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्वरीत चौकशीचे कामकाज सुरु करुन मुदतीत अहवाल सादर करावा.

प्रतः -१) जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, नाशिक

२) सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था (आउयो), कळवण ता.कळवण जि.नाशिक

**प्रत माहितीसाठी सविनय सादर.**

१. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. मा. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, (प्रशासन), नाशिक विभाग, नाशिक.

३. मा. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, (लेखापरिक्षण), नाशिक विभाग, नाशिक.

जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था,नाशिक

क.लि. व.लि. का.अ. स.नि.

Scanned by CamScanner

## परिशिष्ट " अ "

१. बॅकेने संचालक व त्यांचे नातेवाईकांना केलेले कर्जवाटप व त्याचे नुतनीकरण.

२. बॅकेच्या संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या नियमबाहय कर्जामुळे रिझर्व्ह बॅकेने बॅकेस केलेली दंडात्मक कारवाई.

३. बॅकेने थकीत कर्ज खाती बंद करतांना कर्जदारांना दिलेली नियमबाहय सुट

४. सभासद भेटवस्तु वाटपासाठी झालेल्या जादा खर्चास या कार्यालयाची मंजुरीन घेता केलेला जादा खर्च

५. या कार्यालयाची पुर्वयपरवानगी न घेता या कार्यालयाचे अधिकाराचा अनाधिकाराने वापर करुन परस्पर राखीव निधीचा केलेला व्यवहार.

६. अनुत्पादीत कर्ज (नॉन परफार्मींग ॲसेटसबाबत)

७. चौकशी अधिकारी यांना चौकशी वेळी आढळून येणारे इतर गंभीर दोष.

वरील सर्व मुद्दयांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ खालील तरतुदीनुसार सखोल व विस्तृत चौकशी करुन आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय चौकशी अहवालात नोंदविण्यांत यावेत.

क.लि. टं.लि.

DIST. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES, NASIK

( निलकंठ करे )
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था,नाशिक

Scanned by CamScanner